# बंडखोर कवींना प्रोत्साहन हवे

## मर्ढेकर-तांबेंच्या पलीकडे श्रेष्ठ कवी जात नसल्याची पवारांची खंत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'अनेक श्रेष्ठ कवी बा. सी. मर्ढेकर आणि भा. रा. तांबे यांच्या कवितांच्या पलीकडे जात नाहीत. ही बाब मला कायम अस्वस्थ करते. मर्ढेकर-तांबे हे श्रेष्ठ कवी होते, हे मान्य आहे. पण आज अनेक शहरांतून साहित्यिक पार्श्वभूमी नसलेल्या अनेक नव्या बंडखोर कवींचा वर्ग तयार होत आहे. त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम आपण केले पाहिजे', अशा शब्दांत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी मराठीतील प्रस्थापित कविश्रेष्ठांना कानपिचक्या दिल्या.

महाराष्ट्र साहित्य कलाप्रसारिणी सभा आणि 'बुकगंगा पब्लिकेशन'तर्फे सतीश राऊत लिखित 'पाझर हृदयाचा' या काव्यसंग्रहाच्या प्रिंट बुक, ई-बुक आणि ऑडिओ बुकचे प्रकाशन करताना ते बोलत होते. ज्येष्ठ काव्यसमीक्षक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे, वात्रटिकाकार रामदास फुटाणे, कवी अरुण शेवते, उद्धव कानडे, प्रकाशक मंदार जोगळेकर, सचिन इटकर आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'कविता हा माझा प्रांत नाही. मात्र, मी नव्या पिढीतील कवींच्या कविता आवर्जून ऐकतो. मर्ढेकर-तांबे यांच्याशी त्यांची तुलना होऊ शकत नाही. पण साहित्य, कला, पुस्तके यांचा काहीही गंध नसलेल्या कुटुंबात जन्मलेली नवी पिढी विचारप्रवर्तक काव्य करते. उपेक्षित समाजघटकातील कवींच्या कविता ऐकताना अस्वस्थता जाणवते. कष्टप्रद वेदनातून निर्माण होणारे सौंदर्य समाजाकडून नाकारले गेल्यावरचा राग त्यांच्या कवितेतून व्यक्त होतो. सतीश राऊत यांच्या कवितांमध्येही सामान्यांचे दुःख आणि वेदना आहेत. समाजातील वेदना मांडून ते बदलण्याचा प्रयत्न कवींनी केल्यास खऱ्या अर्थाने सामान्यांच्या जीवनात काव्य फुलेल', अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तत्पूर्वी, 'सतीश राऊत यांच्या कविता समाजाभिमुख असून प्रेम, करुणा, बंधुत्व हे त्याचे मूलाधार आहेत. ही कविता वयासोबत विकसित झाली पाहिजे', असे मत काळे यांनी मांडले. 'सरकारी नोकरीत राहूनही संवेदनशीलता आणि परखड मत मांडण्याचे काम सतीश राऊत यांनी केले, असे रामदास फुटाणे म्हणाले, तर 'लोकांशी संवाद साधताना कविता कायम उपयोगी पडल्या', अशी भावना सतीश राऊत यांनी व्यक्त केली.

स्वप्नील शिंदे



महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा आणि 'बुकगंगा पब्लिकेशन्स'तर्फे सतीश राऊत लिखत 'पाझर हृदयाचा' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन कार्यक्रमात गप्पा मारताना माजी केंद्रीय मंत्री शरद पवार आणि ज्येष्ठ वात्रटिकाकार रामदास फुटाणे. या वेळी (डावीकडून) सतीश राऊत आणि डॉ. अक्षयकुमार काळे.

### ते देखील एक काव्य...

पवारांनी यशवंतराव चव्हाण यांच्या दोन आठवणी सांगितल्या. 'यशवंतराव मुख्यमंत्री झाल्यावर काही जणांनी त्यांच्या मातोश्री विठाबाई यांना पेढे दिले. त्यावर यशवंता मुख्यमंत्री म्हणजे काय मामलेदार झाला का? असा सवाल त्यांच्या आईने विचारला होता. कारण त्यांच्या लेखी मामलेदार हेच सर्वोच्च पद होते'. 'एकदा एका वृद्ध स्त्रीने 'सामान्य माणसांचे हित बघतो त्याबद्दल हा खाऊला रुपया घे,' असे म्हणत कमरेच्या चंचीतून निजाम काळातला चांदीचा रुपया चव्हाण यांच्या हाती ठेवला होता.

### पवारांचे अपुरे स्वप्न...

'मी कधीही कविता करायच्या भानगडीत पडलो नाही, मात्र, महाविद्यालयीन काळात सहज दोन ओळी एका कागदावर खरडल्या होत्या. 'का वाटे रोहिणीस चंद्रासवे राहावे, हे आपुले स्वप्न तू... पुरे करावे,' अशा या दोन ओळी होत्या. पण हा कागद माझ्या आईच्या हाती गेला. त्या ओळी वाचून माझे बंधू आईला म्हणाले, 'आता शरदसाठी मुलगी पाहा.. कारण त्याचे अपूर्ण स्वप्न कुठे जाईल याचा काही भरवसा नाही', अशी आठवण शरद पवारांनी सांगताच सभागृहात एकच हशा पिकला.